दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184
▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ८० वा ▶ बुधवार दि.२४ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### दुकाने फोडली; १५ हजारांचा ऐवज लंपास

**सोनगीर ।** नरडाणा (ता. शिंदखेडा) येथील बसथांब्याजवळील व मुख्य बाजारपेठेतील दोन दुकाने फोडण्यात आली असून, चोरट्यांनी १५ हजारांहून अधिक रकमेचा ऐवज लंपास केला. गुरुवारी (ता. १९) मध्यरात्रीनंतर नरडाणा बसस्थानकाजवळील नवकार सुपरमार्टचा पत्रा वाकवून आत प्रवेश करीत चोरट्यांनी तीन हजारांची चिल्लर व दुकानातल्या सीसीटीव्हीचा डीव्हीडी व हार्डडिस्क चोरून नेला. याशिवाय चोरट्यांनी एका मद्य विक्रीच्या दुकानात पत्रे सरकवून प्रवेश केला.

### संस्थेची दिशाभूल; तिघांविरूद्ध गुन्हा

**धुळे ।** तालुक्यातील कुसुंबा येथील सोशल अँण्ड कल्चरल असोसिएशन संस्थेच्या कार्यालयातील शिक्के, लेटरपॅड व महत्वाचे दस्तऐवज चारून नेत दिशाभूल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. अनिल महादू चौधरी यांच्या फिर्यादीनुसार सुरेश महादू चौधरी, रवींद्र महादू चौधरी व शोभा रवींद्र चौधरी यांनी संस्थेची बदनामी व शासकीय कार्यालयाची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने बनावट पत्र तयार करून खोटी माहिती खरी असल्याचे भासविले.

### पिंपळनेरला घरफोडी; ६८ हजार लंपास

**पिंपळनेर ।** तालुक्यातील पिंपळनेर येथे अरुण रमेश पवार (३८) या कुशन कारागिराचे बंद घर अज्ञात भामट्यांनी फोडून घरातील साठ हजार रुपयांच्या रोकडसह साडेआठ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने असा एकूण ६८ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरुन नेला आहे.

# मोदींकडून गुजरात आणि देशात भिंत उभी करण्याचे काम : उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



आता भाजपमुक्त श्रीराम करावा लागेल. सोमवारी अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात गोविंदगिरी महाराज यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलना शिवाजी महाराजांशी केली. ती त्रिवार मान्य नाही, असा कडक इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला. ते मंगळवारी नाशिकमध्ये बोलत होते. शिवसेना मला वडिलोपार्जीत मिळाली. वारशाने मिळाली. आम्ही प्रयत्न केला म्हणून आज भाजप सत्तेत आहेत. असल्याचा दावा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला.

भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर उद्धव ठाकरे यांनी जोरदार हल्ला चढवला. उद्धव ठाकरे म्हणाले की, मोदी पंतप्रधान व्हावे, म्हणून आम्ही देखील प्रचार केला होता. मी देखील मोदींना पंतप्रधान करण्यासाठी प्रचार केला होता. त्या वेळी आम्ही घोटाळेबाज नव्हतो का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. आता कोरोना काळातील घोटाळे काढले जात आहेत. मात्र, तेवढेच नाही तर सर्व मनपातील घोटाळे बाहेर काढा असे आवाहन देखील उद्धव ठाकरे यांनी केले. या वेळी त्यांनी पीएम केअर मधील घोटाळा देखील समोर आणण्याचे आवाहन केले. पीएम केअर फंडात मिळालेला पैसा कुठे गेला, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. रुग्णवाहिकेत झालेल्या घोटाळ्याबाबत तुम्ही बोलत नाहीत, असा आरोपही त्यांनी केला.त्यानंतर अधिवेशनात खासदार अनिल देसाई, खासदार राजन विचारे आणि आमदार अनिल परब यांनी मांडलेले तीन ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. आरक्षण हा आर्थिक प्रश्नाशी निगडीत विषय आहे. सरकारने शेतकरी, कष्टकरी, उद्योग, रोजगार याबाबत घेतलेल्या चुकीच्या भूमिकेतून आरक्षणाची समस्या उद्भवली आहे. सकल मराठा आणि धनगर समाजाच्या मागणीला पाठिंबा देत ओबीसी व इतर कोणत्याही आरक्षणाला हात न लावता संबंधितांची आरक्षणाची मागणी पूर्ण करावी, असे ठराव यावेळी मांडण्यात आले.

### आता काम की बात करो

**७५ वर्षांत काँग्रेसने काय केले? असा प्रश्न विचारणाऱ्यांनी आता दहा वर्षांत काय केले? याचे उत्तर देण्याची ही वेळ आली आहे. राम की बात झाली, आता काम की बात करो, असे आवाहन देखील उद्धव ठाकरे यांनी केले. आमच्यावर काँग्रेससोबत गेल्याचा आरोप करण्याचा अधिकार तुम्हाला नसल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. आमच्यावर हिंदूत्त्व सोडण्याचा आरोप आज करत आहे. ३० वर्ष भाजपसोबत राहिल्याने आम्ही निर्लज्य भाजपवाले झालो नाही, तर काँग्रेससोबत राहुल काँग्रेसवाले काय होणार? असा सवालही त्यांनी केला.**

### अजिबात सत्य नाही

**मी शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या शिवनेरीची माती मी अयोध्येला सोबत घेतली होती त्यानंतरच सर्वोच्च न्यायालयाने राम मंदिराच्या बाजूने निकाल दिला. काल कोणीतरी पंतप्रधानांची तुलना शिवाजी महाराजांशी केली. मात्र, हे अजितबात सत्य नाही. त्रिवार नाही. जर छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज अयोध्येत श्रीराम मंदिर बनले नसते, असा दावा देखील त्यांनी केला.**

# मारण्याचा प्रयोग केल्यास महाराष्ट्रातील एकही रस्ता खुला राहणार नाही!



### जरांगेंचा सरकारला इशारा; पदयात्रा पुण्यात दाखल

**पुणे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईकडे निघालेल्या मनोज जरांगे यांनी सरकारवर गंभीर आरोप करत थेट इशारा देखील दिला आहे. 'आमच्या आंदोलनाला कुठलेही गालबोट लावण्याचा प्रयत्न करू नका, मारण्याचा प्रयोग केला तर महाराष्ट्रातला एकही रस्ता वर्षांवर्ष खुला राहणार नाही, आणि हेही चॅलेंज बघायचं असेल तर बघा, असा थेट इशारा जरांगे यांनी सरकाला दिला आहे.

मराठा आरक्षण यात्रा पुणे जिल्ह्यातून मुंबईकडे जात असून, यावेळी बोलतांना जरांगे म्हणाले की, मराठा समाज एकत्रित आहे, तरीही त्यांच्या लक्षात येत नाही. हे आंदोलन किती गांभीर्याने घ्यायचं हे त्यांच्या लक्षात येत नाही. शब्द दिल्यामुळे त्यांना यायला लाज वाटत असेल, त्यामुळे सरकारने शहाणपण घेतलं तर बरं राहील. समाजाला वेड्यात काढन सोडावं. आरक्षण मिळालं तरी माझ्या जातीपुढे अनेक प्रश्न आहेत. तसेच, मारण्याचा प्रयोग केला तर महाराष्ट्रातला एकही रस्ता वर्षांवर्ष खुला राहणार नाही, हेही चॅलेंज बघायचं असेल तर बघावे. मराठ्यांची दिशा आणि मराठ्यांचे वार कुठल्या दिशेने आहे हे सरकारलापण कळत नाही. जरांगे म्हणाले की समाजाचा प्रगतीसाठी आणि लेकरांच्या भविष्यासाठी शहाणपणाची भूमिका घ्यावी लागेल. शरीर साथ देत नसताना जातीसाठी, समाजासाठी जीवाची ही पर्वा न करता आंदोलन करत आहे. मराठ्यांचा ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत. त्यांना शासनाने ओबीसीचे प्रमाणपत्र द्यावे. शेवटच्या मराठाला आरक्षण मिळेपर्यंत आपण हटणार नाही. आरक्षण अंतिम टप्प्यात असून ही संधी सोडू नका. आपल्यातील एकजूट कायम ठेवा. मराठे एकत्र आले तर ही जात प्रगत होईल आणि कोणापुढे हात पसरण्याची वेळ ही येणार नाही. आरक्षणाने लेकरांचे आयुष्यभराचे कल्याण होईल. मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने मुंबईत दिसतील.

### मी मरायला भीत नाही : मनोज जरांगे

**जरांगे म्हणाले की, आंतरवालीत काही चूक नसताना सरकारने प्रयोग केला. त्यामुळे आम्ही यावेळी सावध आहोत. आरक्षण असलेला आणि आरक्षण नसलेला मराठा एकत्र आला नाही, तर आरक्षण सोडून अनेक प्रश्न आहेत. त्यात जर दरी निर्माण झाली, तर पुन्हा ते कधीही एकत्रित येणार नाहीत. सरकार झोपी गेलंय का? त्यांना हे दिसत नाही का?, लेकरं मोठी करायची तर संघर्ष करावा लागणार आहे. मुंबईकरांनी तांब्या भरून पाणी द्यावं अशी अपेक्षा आम्हाला आहे. समाजासाठी थोडा त्रास सहन करावा, सर्व जाती धर्मातील मुंबईच्या लोकांना हात जोडून अवाहन आहे. मी मरायला सुद्धा भीत नाही, असेही जरांगे म्हणाले.**

## व्यापाऱ्याला लुटणारे दोघे चोरटे पोलिसांच्या ताब्यात; मुद्देमाल केला हस्तगत

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मालेगावहून उधारीचे पैसे घेवून परतणार्या तरूणांना मोटारसायकलवरून आलेल्या दरोडेखोरांनी लळींग घाटात लुटले होते. याप्रकरणी मोहाडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला होता. मात्र, एलसीबीने समांतर करून मालेगावात जावून दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या आहेत. त्यामुळे आठवडाभराच्या आतच गुन्ह्याची यशस्वी उकल झाली आहे.

अनस अक्तर हुसेन खान (२१) हा तरूण आपले मित्र शमशाद असलम मलिक व दिलनवाज मोहम्मद खान यांच्यासमवेत दुचाकीने (एम. एच.१८/बी.एस. ०१४१) मालेगाव येथे गेला होता. तेथील एका व्यापार्याकडे दिलनवाज खान यांच्या मालाची उधारी थकलेली होती. उधारीचे सुमारे २ लाख ४५ हजार ३०० रूपयांची रोकड घेवून ते तिघे मालेगाव येथून धुळ्याच्या दिशेने निघाले होते. तेव्हा दोन मोटारसायकलवरून आलेल्या दरोडेखोरांनी अनस खान यांना अडवून त्यांची पैशांची बॅग पळविली होती.

## बाळासाहेब भदाणे आज मुंबईत करणार भाजपात प्रवेश

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष व प्रथम लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब रावण भदाणे व मित्र परिवाराचा आज भारतीय जनता पार्टीत प्रवेश होणार आहे. मुंबईस्थित भाजपा प्रदेश कार्यालयात हा प्रवेश सोहळा संपन्न होईल. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री ना. गिरीश महाजन, खा.डॉ. सुभाष भामरे, माजी मंत्री आ. अमरिशभाई पटेल, माजी मंत्री आ. जयकुमार रावल, महामंत्री विजय चौधरी, जिल्हाध्यक्ष बबनभाऊ चौधरी आदींसह अनेक भाजपा नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडेल. धुळे ग्रामीणमधील शेकडो निवडक पदाधिकार्यांसह हा प्रवेश होणार असुन, लवकरच धुळे ग्रामीणमध्ये भव्य सहविचार स्नेह मेळावा घेण्यात येणार आहे.

बाळासाहेब भदाणे यांनी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्राबरोबरच क्रिडा, युवक, महिला, आरोंग्य, कृषी, सिंचन, शिक्षण, ग्रामविकास, सांस्कृतीक, धार्मिक आदी क्षेत्रात मोठे काम उभे केले आहे. बोरी पट्ट्यासह तालुक्यात प्रतिष्ठानने उभारलेल्या कामामुळे धुळे ग्रामिणमध्ये मोठा जनसंपर्क उभा राहिला आहे.

## धुळे जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा धरती देवरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

धुळे जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात मंगळवार दिनांक २३ जानेवारी रोजी सर्वसाधारण सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा धरती देवरे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली.

सभेला मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, अतिरिक्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती संजीवनी सिसोदे, यांच्यासह पदाधिकारी व अधिकारी, तसेच सदस्य उपस्थित होते. सभेत विषय पत्रिकेवरील विषयांवर क्रमानुसार चर्चा करून मंजुरी देण्यात आली. त्यानंतर आयत्या वेळच्या विषयांनी ही सभा चांगलीच गाजली. सदस्य ललित वारुडे यांनी वृद्ध कलावंत मानधन निवड समितीच्या बाबतीत केलेल्या तक्रारीचा संदर्भ देत प्रशासनाला धारेवर धरलं. समिती अध्यक्ष पारिजात चव्हाण यांनी कलावंतांच्या मुलाखती घेऊन निवड करताना आर्थिक व्यवहार केले असल्याचा आरोप करीत संबंधितांच्या व्हाट्सअप चॅटिंगचे पुरावे सभागृहात सादर केले.

आरोप खोटे असतील तर संबंधितानी आपल्यावर अब्रुनुकसानीचा दावा दाखल करावा असे थेट आव्हान वारुडे यांनी दिले. सदस्य संग्राम पाटील यांनीही हाच विषय जोराने रेटत अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावर अधिकाऱ्यांनी खुलासा करीत हे प्रकरण वरिष्ठ स्तरावर लक्षात आणून दिले असून आपण आपल्या प्रशासकीय भूमिकेवर ठाम असल्याचं सांगितलं.

## सिंमेंट रस्त्यावर डांबरीकरण होतेच कसे? आयुक्तांकडून अधिकाऱ्यांची झाडाझडती

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



देवपुरातील इंदिरा गार्डन ते जयहिंद चौकापर्यंतच्या सिमेंट रस्त्यावर डांबरीकरण करण्यात आले. असे काम होतेच कसे? महापालिकेच्या अधिकार्यांची तेथे वॉच ठेवण्याची जबाबदारी नाही का? अशी कामे होत असताना संबंधित बेजबाबदार अधिकार्यांना सस्पेंडच करायला हवे, असा सज्जड दम मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी आज मनपाच्या संबंधित अभियंत्याला दिला. शिवाय ज्या-ज्या ठिकाणी रस्त्याची कामे सुरु असतील तेथे मनपाच्या त्या-त्या भागातील अधिकार्यांनी वॉच ठेवावा. तसेच बोगस कामे होत असल्यास नागरिकांनीही थेट मला फोनद्वारे किंवा व्हॉट्सअॅपवर माहिती द्यावी, असे आवाहनही आयुक्तांनी केले.

महापालिकेच्या सभागृहात आज सकाळी ११ वाजता मनपा आयुक्त अमिता दगडेपाटील यांनी आपल्या अधिकारानुसार स्थायी समितीची सभा बोलविली होती. सभेला अति. आयुक्त करुणा डहाळे, उपायुक्त डॉ.संगिता नांदुरकर, करमुल्य निर्धारण अधिकारी पल्लवी शिरसाठ, मनपा सचिव मनोज वाघ, अभियंता कैलास शिंदे, ओव्हरसियर चंद्रकांत उगले, नवनित सोनवणे, सी.सी. बागुल, डॉ.मन्सुर शेख, किशोर सुडके, शेखर बनसोडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सभेच्या अजेंड्यांवर एकूण १२ विषय घेण्यात आले होते. यावेळी मनपा आयुक्तांनी देवपुरातीलजयहिंद चौकाजवळील रस्त्याची गांभीर्याने दखल घेतली.

## लोकसभा, विधानसभा निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी जाहीर

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



आगामी काळात होऊ घातलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आली आहे. दि.१ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा विशेष पुनरीक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. त्यानुसार या यादीत ७ हजार १६३ मतदारांची निव्वळ वाढ झाली आहे. जिल्ह्यातील मतदारांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करुन घ्यावी, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आज पत्रपरिषदेत केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सातपुडा सभागृहात झालेल्या या पत्रपरिषदेत जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्यासह उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद अंतुर्लीकर यांची उपस्थिती होती.

## श्रीराम मंदिर धाम कमानीचे संत आनंदजीवन स्वामींच्या हस्ते उद्घाटन

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

यशस्वी युवा उद्योजक,भाजपा नेते चेतन मंडोरे यांच्या मंडोरे प्रतिष्ठाण तसेच पवन अग्रवाल, शाम अग्रवाल व सहकार्यांच्या अग्रवंशी ग्रुपच्या धार्मिक दातृत्वामुळे धुळ्याच्या धार्मिक, सांस्कृतीक वैभवात भर पडली आहे. शहराचे सौंदर्य खुलले आहे. त्याांच्या संकल्पनेतून आग्रारोडवर कराचीवाला



खुंटानजीक उभारल्या गेलेल्या श्रीराम मंदिर धाम कमानीने धुळेकरांचे लक्ष वेधून घेतले आहे.

या कमानीचे उद्घाटन दि २२ रोजी सायंकाळी देवपुरातील प्रसिध्द अशा श्री स्वामी नारायण मंदिराचे संत आनंदजीवन स्वामी, एकविरा देवी मंदिर ट्रस्टचे सोमनाथ गुरव, गणपती मंदिराचे बाळु गुरूजी, श्रीराम मंदिराचे पुजारी, श्रीराम मंदिराचे विश्र्वस्त अजय नाशिककर, माजी महापौर प्रतिभा चौधरी, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, जयश्री अहिरराव, वालीबेन मंडोरे, पवन अग्रवाल, शाम अग्रवाल, श्रीकांत अग्रवाल अग्रवंशी गृपचे पवन अग्रवाल, संजय भतवाल यांच्या उपस्थितीत झाले.

# अमळनेरमध्ये फेब्रुवारीत होणार अठरावे विद्रोही मराठी साहित्य संमेलन

### कॉम्रेड किशोर ढमाले, अविनाश पाटीलांची पत्रपरिषदेत माहिती

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

विद्रोही साहित्य संमेलनात उत्सव नव्हे तर विचारांची उधळण होईल. घरुन भाकरी खावून विचार पुढे येणारे आपण असून शासनाचे कोणतेही अनुदान न घेता अथवा धनाढ्यांकडून देणग्या गोळा न करता एक मुठ धान्य आणि एक रुपया सामान्यांकडून घेवून त्यांचा सहभाग महत्वाचा मानत हे संमेलन अमळनेर येथे दि.३ व ४ फेब्रुवारी रोजी आयोजीत करण्यात आले आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ ग्रामिण साहित्यीक प्रा.डॉ.वासुदेव मुलाटे हे आहेत. या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने २३ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ते महात्मा गांधी पुतळा या दरम्यानच्या आग्रारोडवरुन संदेश यात्रा काढण्यात येईल अशी माहिती कॉम्रेड किशोर ढमाले, विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे प्रवर्तक अविनाश पाटील, खान्देश साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा.सदाशिव सूर्यवंशी, अहिराणी साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा.भगवान पाटील आणि व्रिदोही सांस्कृतीक चळवळ राज्य कार्यकारणीचे सहसमन्वयक एल.जे. गावीत यांनी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात पत्रकार परिषद घेवून दिली.

या पत्रकार परिषदेत विद्रोही सांस्कृतीक चळवळीचे राज्य संघटक कॉम्रेड किशोर धमाले म्हणाले की, खान्देशातील



अमळनेर येथे ३ व ४ फेब्रुवारी रोजी १८ वे विद्रोही मराठी साहित्य संमेलन होत असून या साहित्य संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिध्द हिंदी व्यंग कवी संपत सरल यांच्याहस्ते होईल. तर प्रख्यात उर्दू साहित्यीक रहेमान अब्बास हे प्रमुख पाहुणे म्हणून असतील. बाबुराव बागुल, वाहरु सोनवणे, डॉ.यशवंत मनोहर, डॉ.अजीज नदाप, आत्माराम राठोड, तारा रेड्डी, तुलसी परब,जयंत पवार, डॉ.आ.ह.साळूंखे, उर्मीला पवार,प्रा.डॉ.आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे या सर्जनशिल प्रगतीशिल साहित्यीक नाटककार, कवी समीक्षकांनी संमेलनाचे अध्यक्षपदे भुषवीत विद्रोही साहित्य संस्कृतीचा आवाज बुलंद केला आहे. अमळनेर येथील धुळे रोडवरील आर.के. नगरच्या समोरील भव्य प्रांगणात हे संमेलन होणार आहे. विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी अमळनेर सह खान्देशातील धुळे जिल्ह्यातील विद्रोही साहित्यीक समविचारी नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते योगदान देत आहेत. त्याचाच भाग म्हणून संमेलनाच्या आयोजनात आणि संयोजनात सर्वसामान्यांचा देखील हातभार लागावा, प्रातिनिधीक योगदान मिळावे यासाठी एकमुठ धान्य दान आणि एक रुपया देणगी मोहिम धुळे शहरातून ऐतिहासिक आग्रारोडवरील छत्रपती शिवाजी पुतळा रोडवरुन महात्मा गांधी पुतळ्यापर्यंत आवाहन करीत २४ रोजी दुपारी ४ वाजता आयोजीत केले आहे. या पत्रकार परिषदेला वरिल मान्यवरांसह मराठी नाट्य परिषदेचे राज्य पदाधिकारी चंद्रशेखर पाटील, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे नवनिर्वाचीत अध्यक्ष मनोज गर्दे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## धुळ्यात पारा ६.३ अंशावर, यंदाच्या हंगामातील नीचांकी तापमान

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

ढगाळ हवामानामुळे राज्याच्या किमान तापमानात चढ-उतार सुरू आहे. पारा घसरल्याने उत्तर महाराष्ट्राला हुडहुडी भरली आहे. धुळे येथील कृषी महाविद्यालयात पारा यंदाच्या हंगामातील नीचांकी पातळीवर पोचला असून ६.३ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे.

आतापर्यंतच्या तापमानातील सर्वात नीचांकी तापमानाची म्हणून नोंद करण्यात आली आहे. उत्तर भारतात थंडीचा कडाका कायम आहे. आज मध्य प्रदेशातील दातीया यथे देशाच्या सपाट भूभागावरील नीचांकी २.८ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले. उत्तर भारतात धुके, थंडीची लाट, थंड दिवस ही हवामान स्थिती कायम आहे. उत्तर महाराष्ट्रात हुडहुडी वाढली असून, धुळे येथील कृषी महाविद्यालयात हंगामातील नीचांकी तापमानाची नोंद झाली. धुळ्यात थंडीचा जोर वाढला असून येणाऱ्या काळात यापेक्षाही कमी तापमानाची नोंद होऊ शकते अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## जय श्रीराम...

प्रभु श्रीराम अयोध्येत विराजमान झाले. संपूर्ण देशाला रोमांचित करणारा हा क्षण होता. यानिमित्ताने साजरा झालेला दीपोत्सव सामर्थ्यशाली भारत साकारण्यासाठी भारतीयांचे मन कायम प्रकाशमय ठेवणारा होईल.

अयोध्येतील मंदिरात श्रीराम विराजमान झाले. संपूर्ण देश या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार बनला. जगभरातील भारतीयांनी दिवाळी साजरी केली आणि राम प्राणप्रतिष्ठेच्या नेत्रदीपक सोहळ्याने सार्या जगाला अचंबित केले. कोट्यवधी भारतीयांना आपला वाटणारा, स्वप्नपूर्तीची अनुभूती देणारा हा सोहळा देशाच्या वाटचालीत सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल, यात शंका नाही. देशप्रेमाची भावना देशाला एकत्र ठेवते, देशाची परंपरा आणि संस्कृती देशातील कोट्यवधी नागरिकांना परस्परांशी जोडून ठेवते. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत भारत एक आहे, असे आपण म्हणतो. विविध भाषा, विविध पंथ आणि विविध धर्म असतानाही त्या एकतेचा पाया अभंग राहतो याचे कारण श्रद्धास्थाने! श्रद्धेची जपणूक, ही भारतीयांना पिढ्या न् पिढ्या मिळालेली शिकवण. या श्रद्धेने देश एकत्र ठेवण्यात जेवढी कामगिरी बजावली तेवढी राज्यव्यवस्थेला देखील कुठल्याच काळात करता आली नाही. एखादी व्यक्ती दक्षिण भारताच्या टोकाला राहात असेल किंवा पूर्व अथवा पश्चिमेला. उत्तर भारतातील काशी, मथुरा आणि अयोध्येचे दर्शन जीवनात एकदा तरी व्हावे ही प्रत्येकाची आंतरिक इच्छा असते. रामाचे महत्त्व त्यासाठी आहे. रामावरील श्रद्धा आणि रामनामाची सोबत भारतीयांसाठी हजारो वर्षांपूर्वीही होती आणि अनंतकाळ राहणार आहे. अनंतकाळ या शब्दात भारतीय संस्कृतीच्या ठळक आणि अभिमानास्पद अस्तित्वाची ठाम ग्वाही आहे. म्हणूनच अयोध्येत उभे राहिलेले अतिभव्य मंदिर आणि त्यात विराजमान झालेले प्रभु श्रीराम याकडे केवळ धार्मिक दृष्टीने पाहून चालणार नाही. भारताच्या पुनरुथ्थानाच्या दिशेने पडलेले पाऊल आणि भारतीय संस्कृतीची ओळख अधोरेखित करणारा चैतन्यमय क्षण असे अयोध्यापुरीतील सोहळ्याचे वर्णन करावे लागेल.

शिवधनुष्य पेलण्याचे आव्हान

राम सर्वांचा आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. ते सर्वार्थाने खरे आहे. रामाचा पराक्रम, नैतिक मूल्यांचे आचरण करून क्षणभंगुर म्हटल्या जाणार्या मानवी जीवनाला त्यांनी मिळवून दिलेला अर्थ आणि येणार्या युगांसाठी दिलेला आदर्श हे स्तिमित करणारे ठरले. यामुळेच भारतासह पूर्वेकडील अनेक देशांमध्ये राम कथा पोहोचली, प्रत्येक नव्या पिढीपर्यंत गेली, त्या समाजाच्या संस्कृतीचा अतूट भाग होऊन गेली. राम अस्मितेचे प्रतीक ठरताना धर्म, पंथ यांचा भारताबाहेरही अडसर आला नाही, हे विशेष. यातच राम नामाचा महिमा आहे. काळाच्या प्रवाहात भारतीय सीमांचे आकुंचन झाले तरी संस्कृती भारताबाहेरही जपली गेली. सत्यवचनी राम त्या संस्कृतीचा आधार असल्याने ती टिकली, शस्त्रबळाने ती लादली गेली नाही म्हणूनच लुप्त झाली नाही. पंतप्रधान मोदी यांनी मंदिर निर्मितीनंतर वैभवशाली राष्ट्रनिर्मितीचे सूतोवाच प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात केले. सर्वांना सामावून घेणारी भारतीय संस्कृती आहे, ती कोणाचा अव्हेर करीत नाही. भारताचे अस्तित्व असंख्य प्रलयंकारी आक्रमणांनंतरही कायम राहिले आणि राहणार आहे ते सर्वसमावेशकतेमुळे. राम सर्वांचा आहे, याला तडा जाऊ देता कामा नये. राम मंदिरानंतरच्या भारताच्या वाटचालीकडे विश्वाचे लक्ष राहणार आहे. देशाच्या प्रगतीत येणारे अडथळे कोणते याचे भान भारतीयांना आहे. राम नैतिकतेचा आदर्श होता. केवळ जय श्रीराम घोषणा देऊन नैतिकता येणार नाही. मंदिर उभारले म्हणजे रामराज्य आले असे नव्हे. राम राज्यात भ्रष्टाचार, व्यसन, उन्माद यांसह कुठल्याच अनैतिक गोष्टींना थारा असत नाही. त्यादृष्टीने प्रत्येक भारतीयाचे निर्धाराने पडणारे पाऊल देशाला विकसित आणि वैभवशाली राष्ट्रांच्या पंक्तीत नेऊन ठेवेल, याबद्दल शंका बाळगता कामा नये. जागतिक पातळीवर भारताचा प्रभाव वाढताना दिसताच मोठ्या देशांकडून अडथळे वाढणार, याची झलक आपण अलीकडेच पाहिली. असे अडथळे निग्रहाने ओलांडून पुढे जाताना अयोध्येच्या रुपात सार्यांनी अनुभवलेले चैतन्यपर्व अखंड प्रेरणादायी ठरणार आहे. राम मंदिराच्या स्वप्नपूर्तीला साक्ष ठरलेल्या वर्तमानातील पिढीचे वर्णन मोदी यांनी 'काळावर विजय मिळविलेल्या मार्गाचे शिल्पकार' असे केले आहे. ते सार्थ ठरविण्यासाठी आव्हानांचे शिवधनुष्य पेलण्यास सिद्ध व्हावे लागेल.

# संकल्पनेतला लेखक घडवणारी अक्षर मानव साहित्य लेखन कार्यशाळा!

लेखक हा समाजाचा आरसा असतो. चांगले लेखक एक चांगला समाज निर्माण करू शकतात. चांगला लेखक निधर्मी, नि:पक्षपाती आणि निस्वार्थी असतो, या संकल्पनेतला लेखक घडवण्यासाठी अक्षर मानव दरवर्षी लेखन कार्यशाळा घेत असते. यावर्षीही ही लेखन कार्यशाळा अंबरनाथ येथील ज्ञानामृत विद्यालय येथे दिनांक २० व २१ जानेवारी रोजी पार पडली. परिवर्तन शिक्षण संस्था संचालक किसन वराडे आणि प्रसिद्ध लेखक, कवी किरण येले यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा ज्ञानामृत विद्यालय येथे नियोजित करण्यात आली. ज्ञानामृत विद्यालयाचे सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने, उपस्थितीने आणि उत्तम नियोजनानाने या कार्यशाळेला वेगळाच रंग चढला होता. सुरुवातीला या कार्यशाळेचे उदघाटन संचालक, लेखक किसन वराडे, कवी किरण येले, मुख्याध्यापक विजय राणे, अक्षर मानव उपाध्यक्ष दीपेश मोहिते, ज्येष्ठ लेखिका डॉ. अनुपमा उजगरे, अक्षर मानव शिक्षण विभाग प्रमुख नीलिमा पगारे, ठाणे जिल्हाध्यक्ष क्षितिज देसाई यांच्या उपस्थितीत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. त्यानंतर किसन वराडे व किरण येले यांनी कार्यशाळेला शुभेच्छा देऊन कार्यशाळा चालू करण्यात आली.

या कार्यशाळेत साहित्य क्षेत्रातील उत्तमोत्तम लेखकांनी हजेरी लावून उपस्थित प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. पहिल्या दिवशी दिनांक २० जानेवारी रोजी सकाळी पहिलं सत्र प्रसिद्ध लेखिका डॉ. अनुपमा उजगरे यांनी घेतले. शुद्ध लेखनाचे महत्व, नेहमी लिखाणात होणाऱ्या चुका आणि शुद्ध , प्रभावी लेखनासाठी काही क्लुप्त्या त्यांनी या सत्रात सांगितल्या. अगदी हसत खेळत लेखनासारख्या महत्वाच्या गंभीर अंगाची उपस्थितांना जाणीव करून देताना लिहिताना गंभीर होण्याचा सल्लाही त्यांनी दिला. या सत्राचा शेवट डॉ. अनुपमा उजगरे यांच्या एका छान कवितेने करण्यात आला.

दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध कवी किरण येले यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थी आणि विद्यार्थ्यांना बोलतं केलं. वाचन आणि लेखन यांचा किती जवळचा संबंध असतो आणि लेखन म्हणजे एक उत्स्फूर्त भावना आहे ती कशी आपल्या आतून बाहेर येते या संबंधी मौलिक मार्गदर्शन करताना अनेक पुस्तकांची माहिती दिली, जी वाचून आपण समृद्ध लेखक आणि एक माणूस म्हणून घडू शकतो.



यासोबत कविता लेखन, त्याची सूत्र आणि मांडणी यावरही चांगली चर्चा घडून आली. कथा, पटकथा, मालिका लिखाणाचा त्यांचा अनुभव त्यांनी उपस्थितांसमोर खूप चांगल्या प्रकारे मांडला. अनेक उपस्थितांनी आपल्या कविता बोलून दाखवल्या. या सत्राचाही शेवट किरण येले यांच्या 'चिल्लर' आणि 'सुरमई' या प्रसिद्ध कवितांनी करण्यात आला.

दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध कवयित्री नीरजा आणि अक्षर मानव आंतरराष्ट्रीय अध्यक्ष श्रीकांत डांगे यांचे स्वागत ज्ञानामृत विद्यालय मुख्याध्यपक विजय राणे आणि ज्येष्ठ शिक्षिका अनिता केदार यांच्या हस्ते करण्यात आले. दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात लेखिका नीरजा यांनी लेखन म्हणजे काय? कविता कशी लिहितात आणि जगण्याच्या प्रसंगातून लेखनाचा प्रवास कसा चालू होतो याचं अनेक उदाहरणं देऊन महत्व पटवून दिलं. त्यांनी स्वतःच्या अनेक कथा या जगण्याच्या नेहमीच्या घटनांतून कश्या निर्माण झाल्या याचीही माहिती दिली. अनेक जुन्या लेखकांच्या शैली विषयी त्यांनी माहिती दिली. काही विषय देऊन उपस्थितांना कविता, लेख लिहिण्यास प्रवृत्त केलं. बऱ्याच जणांनी त्याविषयावर व्यक्त होत शीघ्र लिखाण करत आपल्यातला लेखक जागा केला. यात विशेष म्हणजे ज्ञानामृत शाळेतील विद्यार्थ्यांनी याविषयांवर उत्तम कविता त्वरित लिहुन सादर केल्या. अनुवाद कसा महत्वाचा आहे, तो कसा करावा यावरही नीरजा यांनी मार्गदर्शन केले. यासत्राचाही शेवट नीरजा यांच्या कवितेने करण्यात आला.

यानंतर या कार्यशाळेचे शेवटचे सत्र ज्येष्ठ साहित्यिक राजन खान यांनी घेतले. त्यांच्या नेहमीच्या शैलीत या सत्राची सुरुवात झाली. लेखकाने मेंदूने माणूस असणं कसं गरजेचं आहे. जगातला प्रत्येक माणूस मेंदूने लेखक कसा असतो आणि प्रत्येक माणसाने जग सुखी होण्यासाठी नक्की काय कराला हवं अशा अनेक महत्वाच्या विषयांची मांडणी करत उपस्थितांना विचार करायला लावलं. या जगात ज्या दिवशी एकही लेखक नसेल म्हणजेच या जगात दुःख नसेल असं मत राजन खान यांनी स्पष्ट केलं. या जगात दुःख आहे म्हणून लेखक लिहितोय, लेखक तयार होतायत आणि म्हणूनच या जगात लेखक नसले पाहिजेत म्हणजेच या जगातलं दुःख संपलं पाहिजे यासाठी आपण लेखक म्हणून समाजात उतरलं पाहिजे,निव्वळ लिहुन शांत राहून चालत नाही तर समाजातील प्रश्न, दुःख, वेदना लिहून त्या नष्ट करण्यासाठी समाजात उतरून काम करणारा माणूस हा खरा लेखक असतो असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक राजन खान यांनी केलं. लेखनात करुणेचं महत्व पटवून दिलं. शेवटी उपस्थितांनी आपले प्रश्न विचारले , राजन खान यांनी त्याची उत्तरे दिली.

कार्यशाळेच्या शेवटी परिवर्तन संस्थेचे संचालक यांचा विशेष सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सर्व ज्ञानमृत शिक्षक यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. कार्यशाळेला मार्गदर्शक म्हणून लाभलेल्या डॉ. अनुपमा उजगरे, किरण येले, नीरजा आणि राजन खान यांनाही विशेष सन्मानपत्र देण्यात आले. कार्यशाळेला उपस्थित प्रशिक्षणार्थी यांना प्रमाणपत्र देण्यात आले. यासगळ्यात महत्वाचे म्हणजे ज्ञानमृत विदयालयाच्या ग्रंथालयाला २०० पुस्तकांचा संग्रह अक्षर मानव संघटनेकडून भेट म्हणून देण्यात आला. या कार्यशाळेत सर्व नियोजनात अक्षर मानव प्राथमिक शिक्षण विभाग प्रमुख नीलिमा पगारे, आंतरराष्ट्रीय अध्यक्ष श्रीकांत डांगे, संगीत विभाग प्रमुख अभय वानखेडे, चेतन भास्कर, अंबरनाथ तालुका अध्यक्ष तहसीलदार, ज्येष्ठ नागरिक विभाग प्रमुख भारती मोरे, संगीता गोसावी, पुणे जिल्हा प्रमुख रश्मी घासकडबी, अभि मंगल, सुमित शिंदे, प्रेम दादा, मुंबई जिल्हाध्यक्ष विजय यादव, ठाणे जिल्हाध्यक्ष क्षितिज देसाई यांचं मोलाचं सहकार्य लाभलं. कार्यक्रमात सूत्रसंचालनात शिक्षिका कुंदा झोपे यांचं मोलाचं सहकार्य लाभलं. एकूणच कार्यशाळा यशस्वी झाली आणि पुढील कार्यशाळा लवकर घेण्यात यावी या उपस्थितांच्या विनंतीचा स्विकार करत कार्यशाळेचा समारोप करण्यात आला.



|| लोकरंग ||

**दिलीप साळुंके**

**(नाशिक) मो.९४०४५७५१००**

# गुरुभक्ती काय आहे - - संत राजिंदर सिंह जी महाराज

जेव्हा आपण गुरुभक्ती विषयी बोलतो तेव्हा त्याचे तात्पर्य असे असते की, आपण गुरूंनी दिलेल्या शिकवणुकीला जीवनात उतरवावे. गुरु या शब्दाचे तात्पर्य या दुनियेतील त्या गुरूंविषयी नसून जे या भौतिक दुनियेची शिकवण देतात जसे अध्यापक आणि प्राचार्य इत्यादी. तर गुरु म्हणण्याचा संदर्भ अध्यात्मिक गुरूंशी आहे जे आपल्याला म्हणजेच आपल्या आत्म्याला या भौतिक मायिक विश्वातून बाहेर काढून पिता-परमेश्वराशी लीन करतात. जेव्हा आपण विद्यमान गुरूंच्या चरण कमली पोहोचतो, त्यांच्याकडून दीक्षाग्रहण करतो, तेव्हा आपले गुरु व आपल्यात प्रेमाचं नातं तयार होतं, हे प्रेम शारीरिक नसून केवळ अध्यात्मिक असते. गुरु आणि आपल्यात प्रेमाचं नातं इतकं गाढ असलं पाहिजे ज्याच्यामुळे या मायेच्या दुनियेतील जेवढी आकर्षण आहेत, ती आपल्याला त्यांच्याकडे परत आकर्षित करू शकणार नाहीत. एका खऱ्या शिष्याचा नेहमी असाच प्रयत्न असतो की त्याने आपले जीवन गुरु आज्ञेनुसारच बनवावे यालाच गुरुभक्ती म्हटले आहे.

एक खरा शिष्य हे चांगल्या प्रकारे समजतो की, गुरूंच्याद्वारे शिष्यच्या आत्म्याचे मिलन पिता परमेश्वरांशी होऊ शकते. जर आपल्याला एका शिष्याप्रमाणे आपला आत्मा परमात्म्यात लीन करायचा असेल तर आपल्याला आपलं पूर्ण लक्ष अध्यात्मिक मार्गावर देण्याची आवश्यकता आहे. अध्यात्मिक मार्ग अनुसरण्यासाठी सर्वप्रथम आपल्या अंतरी असलेल्या गुरूंप्रति प्रेम निर्माण करावे लागेल. या धावपळीच्या अशा दुनियेमध्ये आपण हे कसे करू शकतो? कारण की या मायेच्या दुनियेतील आकर्षणे त्यांच्याकडे आकृष्ट करतात. ती शक्ति असे इच्छित नाही की आपण सर्व आत्मे परमेश्वराशी लीन व्हावेत, याच करिता ती शक्ति आपल्या या दुनियेच्या प्रलोभनां मध्ये फसवून ठेवते.

या मायेच्या जंजाळातून वाचण्याकरिता केवळ अध्यात्मिक गुरुच मदत करू शकतात, हे कसे काय? कारण की त्यांच्याजवळ एक दिव्यशक्ती आहे आणि ती म्हणजे त्यांचे दिव्य प्रेम. त्यांचे हे प्रेम त्यांच्या नेत्रांद्वारे आपल्यापर्यंत पोहोचते. जर आपण ग्रहणशील असलो तरच आपण त्या दिव्य प्रेमात रंगून जातो. ज्यामुळे ते आपल्याला या दुनियेच्या आकर्षणापासून मुक्त करून कायमचे प्रभु प्रेमाने ओतप्रोत करतात. ही गुरु प्रेमाची शक्ति आहे त्यामुळे आपण आपल्या निजधामी परमेश्वराकडे परत जाऊ शकतो.

आपले गुरु इच्छितात की, आपण अध्यात्मिक शिकवणुकीला समजून आपल्या जीवनात उतरवावे. जेणेकरून याच जन्मामध्ये आपल्या आत्म्याचे मिलन पिता-परमेश्वराशी होईल. परंतु आपण ना कधी परमेश्वराला पाहिले, ना कधी त्यांच्याशी बोललो आहोत, ज्याला कधी भेटलो नाही, कधी पाहिले नाही त्याच्यावर प्रेम करणं कठीण आहे. तर मग आपण परमेश्वरा प्रति प्रेम कसे उत्पन्न करू शकतो? एवढं गाढ प्रेम जे या दुनियेच्या सर्व प्रकारच्या आनंदापेक्षाही लोभस वाटेल. याचे साधे सरळ उत्तर असे आहे की आपण गुरुद्वारे परमपिता परमेश्वरावर प्रेम करू शकतो, कारण गुरूला परमात्म्याचे रूप म्हटले आहे. त्यांच्या प्रेमाद्वारेच आपण पिता-परमेश्वरावर प्रेम करू शकतो. गुरूंच्या माध्यमातून आपण पिता परमेश्वराचे प्रेम प्राप्त करू शकतो. जे या दुनियेतील प्रेमाच्या कित्येक पटीने अधिक आहे. हे प्रेम गुरूंच्या शारीरिक रूपाशी नव्हे तर त्यांच्या अंतरी काम करणाऱ्या, प्रवाहित होत असणाऱ्या प्रभू सत्तेशी आहे.



या वास्तवतेला आपण एका उदाहरणाद्वारे समजू शकतो, जेव्हा आपण घरी दिवे लावतो तेव्हा आपल्याला बिल बल्बच्या कंपनीकडून आकारले जात नाही, ते आपल्याला वीज कंपनीकडून मिळते जिथे विद्युत निर्मिती होते. बल्ब केवळ एक माध्यम आहे. त्यामुळे आपल्या घरात प्रकाश पोहोचतो. आपल्याला बल्बची आवश्यकता आहे, आपण बल्बला महत्व देतो. परंतु खरी वीज तर विज कंपनीकडून येत असते.

अशाच प्रकारे गुरुंचे शरीर सुद्धा बल्ब सारखे माध्यम आहे. त्यांच्याद्वारे परमात्म्याची शक्ति आपल्यापर्यंत पोहोचते. याच करिता आपण गुरूंविषयी आदर बाळगतो, त्यांना मान देतो या भौतिक चर्मचक्षुंनी आपण केवळ भौतिक गोष्टी पासून बनवलेल्या वस्तू पाहू शकतो, परमात्मा नाही. गुरु आपले शिवनेत्र (दिव्य चक्षु) उघडतात, ज्यामुळे आपण आपल्या अंतरी प्रभूच्या ज्योति आणि श्रुतिचा अनुभव करू शकतो. गुरुच्या माध्यमातून पिता-परमेश्वर त्याच्या धामास बोलावितो. आपण परमात्म्याचा आवाज प्रत्यक्षपणे ऐकू शकत नाही, परंतु आपण गुरूंच्या सत्संग अथवा प्रवचनातून परमेश्वर आपल्याकडून काय इच्छितो, हे ऐकू शकतो.

पिता-परमेश्वराने गुरु शिष्यामध्ये प्रेमाचे नाते या करिता बनवले जेणेकरून शिष्य आपल्या गुरूंवर प्रेम करेल आणि त्या दिव्य प्रेमाद्वारे परत परमेश्वरापर्यंत पोहोचू शकेल. जेव्हा आपण कोणावर प्रेम करतो तेव्हा आपण त्यांचे म्हणणे जरूर मानतो. त्याकरिता आपण आपल्या गुरूंवर प्रेम केले पाहिजे आणि त्यांचे म्हणणे ऐकले पाहिजे. आपण आपल्या जीवनामध्ये सदगुण धारण करून दररोज ध्यान अभ्यासाकरिता वेळ द्यावा, ज्यामुळे आपल्या आत्म्याचा मिलाप याच जीवनात पिता-परमेश्वराशी होईल, हीच खऱ्या अर्थाने गुरुभक्ती होय.

**- संत राजिन्दर सिंह जी महाराज**

## शब्दकोडे-३०२



**आडवे शब्द -**

२. शेवट, मावळणे ३. अकबराशी शर्थीने लढणारा शूर राजपूत ७. ताठा ८. प्रतिबंध १०. समेट ११. झेप १२. व्यवस्थित १६. शपथ १७. आकाश १९. दासी २०. स्वयंपाकाची कला २१. दहशत २३. दारुमुळे निकामी होणारा अवयव २४. जिन्नस २५. राजाची पत्नी २६. त्वरित २८. वर्ष ३०. हत्ती ३२. सूर्य ३४. भारताच्या दक्षिणेचा समुद्र ३८. वाटाड्या ४०. ओळ ४१. लहान ४२. पाणी ४३. पाणी ४३. समानता ४५. जास्त किमतीचे ४६. व्यापारी ४७. एक कडसर पालेभाजी ४९. मुलाची पत्नी ५०. अपशकुन ५२. पालखी ५३. अश्व ५४. पोहणे ५६. डोके ५७. बूड ५८. रावणाची मुखे ५९. हस्त ६०. पाश्चात्य स्नानपात्र ६१. मार्ग ६२. अपराध्याच्या वतीने घातलेली भीड ६४. छोटा ६६. स्त्री ६८. परिणय ६९. घट्ट ७०. नस ७१. झोप ७३. वात्सल्य ७४. आजार ७६. मिठी ७९. आईची बहीण ८२. पुष्कळ (ग्रामीण) ८४. बंगाली मिठाई प्रकार ८७. रुची, पसंती ८८. विपुल ८९. सरशी

**उभे शब्द -**

१. आटोपशीर आकारचे २. भूमी ४. रूढी ५. अंगिकार, स्वीकार ६. वनराज ७. नोकर ९. पुष्कळ ११. जमीन व पाणी यापैकी कोठेही राहू शकणारा सजीव १३. पत्र १४. सूतकताईचे साधन १५. मिश्रण, खिचडी १६. थालिपीठ वा चकलीचे पीठ १८. पूर्वज २२. शक्ती २४. अपमान २५. राजाची आई २७. गांधीजींचे एक तत्त्व २८. सारखा २९. तल्लीन ३१. सुखी माणसाचे वस्त्र ३३. वीर स्त्री ३५. केविलवाणा ३६. कुत्रा (सं.) ३७. आवड ३९. दुर्दैव ४४. प्रासाद ४८. पुन्हा ५१. ताजेपणा ५२. कृपा ५३. स्वयंपाकात तसेच सौंदर्य प्रसाधनातही वापरला जाणारा पिवळे चूर्ण ५४. प्रखर ५५. तृष्णा ५७. झाकीर हुसेन यांचे वाद्य ६०. टिंगल ६३. सहजी ६५. नुकसानकारक ६६. मराठी माणसाची प्रिय करमणूक ६७. शांतता ७२. झुंड ७३. मक्षिका ७५. ताकद ७७. आशीर्वाद ७८. वन, बाग ८०. पारंब्या असलेले झाड ८१. आदर ८३. शाहिराचे वाद्य ८५. सांप्रत ८६. ध्येय

## शब्दकोडे-३०१ चे उत्तर

**आडवे उत्तर**

३.सखी ७.गाव ९.अंदाजपत्रक १०.खळबळजनक १३.वारस १४.डावा १५.हारजीत १७.गवत १९.मार २०.खडा २१.धनी २२.नूतन २३.नस २४.तलाव २५.मानव २७.तीन २८.रसभंग ३०.जळ ३१.लड ३३.सडा ३४.साफ ३५.खडतर ३६.हाव ३८.दासी ३९.साल ४०.हवस ४३.नवरी ४५.राख ४६.अटन ४८.डरपोक ५१.कबरस्तान ५२.नवरा ५४.कव ५५.गर्वाचे घर ५६.लत ५८.नवल ६०.वर्धमान ६३.गरिमा ६५.यथा ६७.बाहेरखाली ६८.तगडा ६९.काळीज ७१.खबर ७२.समा ७३.नरमाई ७४.कृतक ७७.चाक ७८.नेता ७९.वीतराग ८०.ब्र ८१.सरकी ८२.गणेश

**उभे उत्तर**

१.सदाशिव २.कापड ३.सकवार ४.जाळ ५.हळवा ६.मानहानी ८.वरात १०.खसखस ११.बडा १२.कर १६.जीवनसत्त्व १७.गवती चहा १८.तनू १९.मानस २१.धवल २२अ.तरफदारी २३.नग २४.तळतळाट २६.वडा २९.भंग ३०.जड ३२.डराव डराव ३५.खल ३७.वन ३९.साखर ४१.सर ४२.चाकवत ४४.वरचेवर ४५.राब ४६.अनल ४७.नन ४९.पोक ५०.लंगडा बाळकृष्ण ५१.करवली ५३.वनमाळी ५७.तग ५९.लय ६१.मातबरी ६२.नगर ६४.रिकामा ६६.थाप मारणे ६७अ.ख्याती ७०.जनता ७२.सकस ७५.कवी ७६.सुरा ७८.नेकी

# आर्थिक स्थैर्य वाढण्याची शक्यता

सध्या जगात गुंतवणूक करण्यासाठी भारतासारखा दुसरा देश नाही. आपल्या देशाचे इतर देशांशी वधारलेले व्यापारसंबंध हीदेखील मोठी जमेची बाब आहे. थोडक्यात, आता आपले मार्केट आणि आपल्या संस्था (रेग्युलेटरी बॉडिज) कार्य समाधानकारक झाल्यामुळे भारतात सुरक्षितता निर्माण झाली असून आगामी आर्थिक वर्षात त्याची चांगली फळे दिसून येतील, असे मानण्यास हरकत नाही.

२०२४ च्या दमदार सुरुवातीनंतर आगामी आर्थिक वर्षाचे वेध लागणे स्वाभाविक आहे. देशातीलच नव्हे तर जगातील स्थिती युद्धज्वर वा अन्य कारणांमुळे दोलायमान असताना येणाऱ्या आर्थिक वर्षातील चित्र कसे असेल, हे जाणून घेण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. मात्र २०२४ ची सुरुवात आश्वासक वातावरणात होणे ही समाधानाची बाब म्हणता येईल. शेअर बाजारात तेजी येणे, नवीन शेअरला अतिसदस्यता मिळणे, बाजारात दररोज नवा उच्चांक निर्माण होणे ही नक्कीच वर्षाची चांगली सुरुवात होती, कारण यातून बाजाराचा सकारात्मक नूर प्रतीत होतो. तसे पाहिले तर आंतरराष्ट्रीय पातळीवर परिस्थिती अस्थिर आहे. इस्रायल - हमास यांच्यातील लढाईमुळे निर्माण झालेला तणाव संपलेला नाही. रशिया आणि युक्रेन यांच्यातही ताण आहेच. त्यांच्यामध्ये कधी काय होईल हे सांगता येत नाही. तिसरीकडे चीन आणि तैवान यांच्यातील संबंधही ताणलेले आहे. गेल्या काही काळापासून चीन आणि अमेरिकेचे संबंधही तणावपूर्ण असून अमेरिकेने काही बंधने लादली असल्यामुळे चीन पुन्हा डोके वर काढण्यास तयार असून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील आपले वर्चस्व अबाधित ठेवण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. 'गोल्डमन सॅक्स' नामक अमेरिकन कंपनीच्या जी मोनिल यांनी 'ब्रिक' नामक एक संघटना २००१ मध्ये काढली होती. त्यात ब्राझील, रशिया, भारत आणि चीन यांचा समावेश होता. नंतर त्यात दक्षिण आफ्रिका समाविष्ट झाली. त्यांना ब्रिक देश म्हणून ओळखले जाऊ लागले. आता २०५० पर्यंत 'ब्रिक'मधील हे देश जगातील मोठ्या शक्ती होतील आणि त्या सर्वांची एकंदर अर्थव्यवस्था मिळून जगातील सहा मोठ्या देशांच्या (इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, इटली, जपान, जर्मनी) अर्थव्यवस्थेपेक्षा मोठी होईल, असे समजले जात आहे. प्रत्यक्षात हे खूपच आधी म्हणजे २०१५ मध्येच पाहायला मिळाले. त्यानंतर कोरोनाचा काळ आला. परिणामस्वरूप ब्रिक देशांचा जोर थोडा कमी झाला. ब्राझील, रशिया या देशांमधील काही अंतर्गत प्रश्नांमुळेही त्यांच्या वाढीला खीळ बसली. युद्धामुळे रशियाचा जोरही कमी झाला आहे. पण असे असताना २००० पासून भारताच्या एकंदर आर्थिक प्रगतीचा आढावा घेता इतक्या वर्षांमध्ये जागतिक नामांकनामध्ये आपण चांगली प्रगती केलेली दिसते. **- क्रमश:**

**- अनंत सरदेशमुख (ज्येष्ठ अभ्यासक)**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.

**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.

**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# एमईटी भुजबळ नॉलेज सिटीच्या एमईटी बीकेसी उत्सव २४ ची जोरदार सुरुवात





**नाशिक । प्रतिनिधी**

एमईटी भुजबळ नॉलेज सिटीचा अत्यंत प्रसिद्ध अशा उत्सवास कालपासून सुरुवात झाली. कार शो, बाईक शो यामध्ये विंटेज कार, रेस कार, बाईक्स लेटेस्ट, डव्हान्स बाईक्स यांची रॅली अत्यंत सुंदर पद्धतीने पार पडली. त्यानिमित्ताने या उत्सवाचे उद्घाटन झाले. संस्थेच्या मार्गदर्शिका डॉ. शेफाली भुजबळ, सर्व इन्स्टिट्यूटचे प्राचार्य, रजिस्ट्रार, ट्रस्ट ऑफिसचे पदाधिकारी, विद्यार्थी, पालक, पाहुणे हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उत्सवात रक्तदान शिबिर तसेच ऑरेंज ज्यूस हा इन्स्टा वरील फेमस प्रोग्रॅम याच्यामध्ये कॉमेडी आणि रॅप साँग याचं मिश्रण आहे. त्याचबरोबर झुंबा, आर्ट गॅलरी असे अनेक गोष्टी आणि बॉलीवूड वेशभूषेतील विद्यार्थी यामुळे संपूर्ण कॅम्पस नटून गेला होता. तीन दिवस वेगवेगळे वर्कशॉप आणि सांस्कृतिक कार्यक्रम याबरोबरच दि. २७ जानेवारीला सायंकाळी ग्रँड फिनाले ठेवण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांचा विकास विद्यार्थ्यांनीच करावा, यानिमित्ताने त्यांनी स्वतः सहभाग घेऊन अनेक गोष्टी शिकाव्यात, मॅनेजमेंट शिकावी, विविध कलागुणांचा स्वतः त्यांनी अनुभव घ्यावा असा या उत्सवा मागचा उद्देश असल्याचे संयोजकांनी सांगितले. अतिशय रंगारंग कार्यक्रमाने उत्सवास सुरुवात झाली. संस्थेचे विश्वस्त समीर भुजबळ यांनी या निमित्ताने 'हसा खेळा, पण शिस्त पाळा' असे सांगून विद्यार्थ्यांनी या प्लॅटफॉर्मचा उत्तम उपयोग करून घ्यावा असा संदेश यानिमित्ताने दिला.

## मोहंमद रफी गीतांची आज विनामूल्य मैफल

**नाशिक ।** शतकातून एखाद्याच वेळी जन्मणाऱ्या सुरेल गायक स्वर्गीय गायक मोहम्मद रफी यांच्या गीतांची मैफल आज दि.२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. यंदा मोहम्मद रफी यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्ताने वर्षभर प्रत्येक महिन्याच्या २४ तारखेला मैफल करण्याचे ठरविले आहे. या मालिकेतील पहिले पुष्प संयोजक घनश्याम पटेल व सूर श्रद्धा म्युझिकल फाउंडेशनतर्फे गुंफण्यात येईल. सायंकाळी ५.३० वाजता परशुराम सायखेडकर नाट्यगृहात होणाऱ्या 'सौ बार जनम लेंगे' या मैफलीत मुख्य गायक घनश्याम पटेल यांच्या बरोबरच संजय डेरे, खिमजी शाह, अजय पाटील, अमित गुरव रफींची गाजलेली गाणी सादर करतील. त्यांना स्मिता पांडे, ज्योती फाल्गुने स्वरसाथ तर दिनेश गोविल सूत्रसंचालन करणार आहेत. सर्व रसिक श्रोत्यांनी या विनामूल्य मैफलीला उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ५००० गायक-गायिकांनी केली सुरेल स्वरातून श्रीराम आराधना

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरातील तब्बल ५०० हून अधिक मंदिरे, आश्रम, रहिवाशी संकुलामध्ये कलाकारांनी श्रीराम गीतगायनाची महासेवा अर्पण केली. सोमवारी अयोध्येमध्ये श्रीराम जनमभूमी न्यास आयोजित प्रभू श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाला. यादिवशी नाशिक पुण्यनगरीमध्ये प्रभू श्रीराम चरणी गाण्यांची महासेवा अर्पण करण्यात आली.

गायक ज्ञानेश्वर चौधरी यांच्या संकल्पनेतून ५००० पेक्षा अधिक गायक, गायिका, भजनी मंडळे, सत्संग साधक यांनी अतिशय श्रद्धेने भक्तीभावाने श्रीरामाची गाणी, इतर हिंदी-मराठी भक्तीगीते, भजने, श्रीराम चौपायी सादर केली. यात



सर्व गायक-गायिका, ५० कराओके क्लब, अनेक संगीत शिक्षक-शिक्षिका, त्यांचे शेकडो विद्यार्थी, सुप्रसिद्ध व हौशी गायक-गायिका, भजनी मंडळे, सत्संग साधक यांनी गायन केले. काही धार्मिक संस्था, अनेक मंदिर समिती, शेकडो रहिवाशी संकुले, काही राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, श्रीरामभक्त सेवक यात सक्रीय सहभागी झाले होते. रेडिओ विश्वासतर्फे या उपक्रमात सहभागी होण्यासाठी नाशिकच्या कलाकारांना आवाहन केले होते. या आगळ्यावेगळ्या उपक्रमासाठी ज्येष्ठ गायक व संगीत मार्गदर्शक नंदकुमार देशपांडे यांच्यासह उमेश गायकवाड, प्राजक्ता गायधनी, धनंजय जैन, हितेश कारिया, सोनाली गायकवाड, सुयोग कुलकर्णी, मुकेश भारती, मुकुंद बोरसे, शैलेंद्र बकरे, शैला नेरकर, किरण गोसावी, राज अक्कर यांचे विशेष सहकार्य लाभले.

## देवळाली कॅम्प शिवजन्मोत्सव सोहळा अध्यक्षपदी गोडसे

**नाशिक ।** शिवजन्मोत्सव सोहळा समिती देवळाली कॅम्प शहर २०२४ च्या अध्यक्षपदी अजिंक्य हेमंत गोडसे यांची निवड झाली



आहे. देवळाली कॅम्प शहर व पंचक्रोशीतील सर्व नागरिकांच्या वतीने सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. अध्यक्ष पदाच्या निवडीनंतर अनेक सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, क्षेत्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला आहे.

**निधन वार्ता**

## सखुबाई सांगळे

**नाशिक ।** सखुबाई वाळीबा सांगळे (६५) यांचे सोमवार दि.



२२ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी असा परिवार असून दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब घुगे यांच्या त्या मामी होत्या.

# प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त मनसेचे दिलीप दातीर यांनी वाटले ११ हजार लाडू

**नाशिक । प्रतिनिधी**

५०० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अयोध्येतील नवनिर्मित भव्यदिव्य मंदिरात सोमवार दि.२२ रोजी प्रभू श्रीरामललांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त नवीन नाशिक परिसरात मनसेचे माजी जिल्हाध्यक्ष व माजी सभागृह नेते दिलीप दातीर यांच्या वतीने ११ हजार लाडूंचे वाटप करण्यात आले. श्रीराम मूर्ती प्रतिष्ठापना विधी संपन्न होताच परिसरात मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा करण्यात आला.

यावेळी त्रिमूर्ती चौकात मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते जमले होते. एक ही नारा एक ही नाम, जय श्रीराम जय श्रीराम, सियावर रामचंद्र की जय, पवनसुत हनुमान की जय आणि भारत माता की जयच्या घोषणांनी सर्व परिसर दुमदुमून गेला होता.

यावेळी माजी महापौर तथा



प्रदेश सरचिटणीस अशोक मुर्तडक, प्रदेश उपाध्यक्ष पराग शिंत्रे, मनसे कामगार सेना प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, माथाडी कामगार सेना जिल्हाध्यक्ष योगेश शेवरे, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, मनिषा दातीर, निर्मला पवार, अरुणा पाटील, आरती खिराडकर, मनविसे उपाध्यक्ष संदीप भवर, शशिकांत चौधरी, जिल्हाध्यक्ष महेश लासुरे, मनोज गोवर्धने, शहराध्यक्ष ललित वाघ, शहर संघटक अक्षय कोंबडे, विभाग अध्यक्ष मेघराज नवले, नितीन धानापुणे, मनोज सावंत, शुभम थोरात, मनोज घोडके, अनंत सांगळे, विजय अहिरे, विनायक पगारे, अक्षय खांडरे, गणेश कोठुळे, संतोष कोरडे, बंटी कोरडे, अमित गांगुर्डे, जावेद शेख, संजय देवरे, योगेश पाटील, रोहित उगावकर, सत्यम खंडाळे, योगेश दाभाडे, बंटी लबडे, भाऊसाहेब निमसे, नितीन माळी, रोहन देशपांडे, नितीन पंडित, बबन जगताप, राहुल पाटील, समाधान चव्हाण, स्वप्नील पाटोळे, अजिंक्य काळे आदींच्या उपस्थितीत लाडूंचे वाटप करण्यात आले.

# गजानन ग्रुपतर्फे प्रभू श्रीरामाची प्रतिमा पूजन

**धुळे । लक्ष महाराष्ट्र**

अयोध्या येथील श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त साक्री रोड, मोगलाई परिसरातील मोतीनाला येथे गजानन ग्रुपतर्फे श्रीरामाची प्रतिमा पूजन करण्यात आले.

यावेळी शिंदे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख मनोज मोरे, धुळे महानगर प्रमुख संजय वाल्हे, माजी सरपंच दादाजी महाले, उपाध्यक्ष योगेश लंगोटे, प्रसिध्दी प्रमुख आबासाहेब



सैंदाणे, डॉ.रामचंद्र चित्ते, संदीप लंगोटे, महादू आप्पा देखनाळे, पेडकाईचे संचालक गोपालभाऊ आदींनी प्रभू श्रीराम प्रतिमा पूजन करुन उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी प्रभू श्रीराम कलश उद्घाटन सोहळा झाल्यानंतर राम भक्तांना मिठाईचा प्रसाद देण्यात आला.

यावेळी बजरंगबलीची वेषभुषा कृष्णा लंगोटे याने केली होती. रोहन सैंदाणे व आदी बालकांनी परिसरातील राम भक्तांचे लक्ष वेधून घेतले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उत्तम महाले तर आभार दादाजी महाले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी इंजिनिअर स्वप्नील महाले, महादू आप्पा देखनाळे, संदीपभाऊ लंगोटे, गोपालभाऊ, प्रेस फोटोग्राफर राजेंद्र सैंदाणे, गोपाल सैंदाणे, स्वप्नील महाले, तुषार राजपुत, रमेश भंडारी, गुलाब ठाकूर आदींनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या डॉक्टर सेलच्या शहराध्यक्षपदी डॉ.कारंडे



**नाशिक । प्रतिनिधी**

डॉ. सागर कारंडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या डॉक्टर सेल नाशिक शहराध्यक्षपदी निवड झाली असून राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते व शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांच्या उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे यांच्या नेतृत्वाखाली व मुंबई प्रदेशाध्यक्ष समीर भुजबळ, दिलीप खैरे, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, डॉक्टर सेल जिल्हाध्यक्ष डॉ. गोसावी, खैरनार या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरांचे युवा नेतृत्व डॉ. सागर कारंडे यांची डॉ. सेल शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली. डॉ. कारंडे यांच्या निवडीनंतर स्थानिक नेत्यांसह सर्व स्तरातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांच्या उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.


## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार रत्ना शशिकांत जाधव, रा. उभंड, ता. साक्री, जि. धुळे, ह.मु. ५ब, छोरीया टाऊन शिप, साक्री, जि. धुळे यांनी त्यांचे मालकीचे मौजे साकी, ता. साक्री, जि. धुळे येथील गट नं. ११७ पैकी प्लॉट नं. ५ ब चे एकूण क्षेत्र ११२ चौ.मी. या मिळकतीस अनुषंगुन एच.डी.एफ.सी. बँक लि., शाखा देवपुर, धुळे यांचेकडे गृह कर्ज मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचे मालमत्तेचे रत्ना शशिकांत जाधव यांच्या खरेदीपूर्वी झालेले मालकी हस्तांतरणा बाबतचे म. दुय्यम निबंधक, साक्री, जि. धुळे यांचेकडे नोंदविलेले खरेदीखत व त्याची मुळ एस. आर. पावती गहाळ/ हरविले असल्याचे माझे पक्षकारांनी कळविले आहे, ते येणे प्रमाणे मा. दुय्यम निबंधक सो., साक्री, जि. धुळे यांचे कार्यालयात, दिनांक २२/०७/२००८ रोजीचे दस्त क. १७२९/२००८ अन्वये नोंदणीकृत खरेदीखत व त्याची एस. आर. पावती.

सदरचे मुळ दस्त हे माझे पक्षकार घेत असलेल्या गृह कर्जा बाबत लिंक दस्ताऐवज असुन सदरचे दस्ताऐवज कोणासही मिळाली असल्यास त्याचा कोणीही गैरवापर करू नये तसेच सदरचे खरेदीखताची पावती कोणत्याही संस्थेकडे, बॅन्केकडे किंवा इतर कोणाहीकडे तारण गहाण/नजर गहाण असल्यास किंवा त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा हितसंबंध असल्यास किंवा कोणालाही मिळून आल्यास किंवा कोणाचाही उजर आक्षेप असल्यास पुराव्याचे मुळ कागद पत्रांसह खालील पत्त्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्याचे तारखेपासुन ७ दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन भेट घ्यावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकत/नोटीस आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच मुदतीनंतर कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र, माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे :
दिनांक : २३/०१/२०२४

**ॲड. विजय म. मोरे**
नोटरी-भारत सरकार
ऑफिस - बी / १२, भन्साली प्लॉझा, नगरपटटी, धुळे.

---

जावक क्रमांक/५८/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, धुळे
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय धुळे,
पिंपालेक कॉम्पप्लेक्स, मोगलाई शाळा नं. १४ समोर, साक्री रोड, धुळे.
दि-०३/१/२४

## चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: DHL/३४८२८/१८६०/२३
फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक.---------
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री कुंदकेश्वर महादेव सामाजिक व सांस्कृतिक ट्रस्ट देवपूर धुळे बाबत
न्यासाचा पत्ता :- २१ ब गजानन कॉलनी, देवपूर धुळे, धुळे, धुळे, धुळे, धुळे
अर्जदार - मधुकर रामदास पाटील,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, धुळे, हे वर

नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | १००१ (Cash In Hand) | ११०११.0C |

(अ) जंगम मिळकत:- रोख रु. ११०११/- मात्र
(अक्षरी रुपये अकरा हजार अकरा मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**
अ.क्र.-१
शहर किंवा गांव-०
सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र.-०
क्षेत्र-०
मूल्याकन-०
मुदत / कालावधी किंवा स्वरूप-०
अंदाजे मूल्य-०.००
(ब) स्थावर मिळकत :- रोख रु. ०/- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी, त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जा निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २९/१२/२०२३ रोजी दिली.

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय धुळे विभाग धुळे

---

**ॲड. स्वप्निल सुरेश सोंजे**
**नि ६**

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं ९९/२०२४**

मोतीलाल शंकर गढरी वगैरे ....**अर्जदार**
**॥ विरुध्द ॥**
**कोणीही नाही**
(कै. सिंधुबाई मोतीलाल गढरी - मयत) ...**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि.११/०१/२०२४ रोजी दि. कि. अर्ज नं. ९९/२०२४ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. सिंधुबाई मोतीलाल गढरी यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. २२/०२/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर कोर्ट नं. ५. यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण- धुळे
दिनांक :-२२/०२/२०२४ आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**मे. दिवाणी न्यायालय साो. कोर्ट नं. मे. दिवाणी न्यायालय साो. कोर्ट नं.**

---

**ॲड. प्रमोद एम. चौधरी**
**नि.६**

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) साो. यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज नं १२६/२०२४**

किरणबाई दिगंबर माळी वगैरे ....**अर्जदार**
**॥ विरुध्द ॥**
**कोणीही नाही**
(कै दिगंबर अवचित माळी -मयत) .....**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) साो. यांचे न्यायालयात दि. १८/०१/२०२४ रोजी दि. कि. अर्ज नं. १२६/२०२४ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. दिगंबर अवचित माळी यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. २८/०२/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर कोर्ट नं. ५ यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण - धुळे
दिनांक :- २२ /१/२०२४ आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय साो. (व.स्तर) धुळे** **मे.दिवाणी न्यायालय साो. (व.स्तर) धुळे**

---

**ॲड. दिनेश मधुकर कोळी**
**साक्री कोर्ट**

## जाहीर नोटीस

**साक्री येथिल मे. दिवाणी न्यायाधीश सो क.स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अ. नं. ३२/२०२४**

श्रीमती. मनीषा रामकृष्ण भदाणे वगैरे ....**अर्जदार**
**॥ विरुध्द ॥**
**कोणीही नाही** .....**सामनेवाला**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VIII) बॉम्बे १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालयात क स्तर कोर्टात दाखल केला आहे कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की कै. रामकृष्ण यशवंत भदाणे यांचे दि.१२.१०.२०२३ रोजी दुसाणे, ता. साक्री, जि. धुळे येथे निधन झाले आहे. मयताला मुत्युसमयी खालीलप्रमाणे वारस होते

१. श्रीमती. मनीषा रामकृष्ण भदाणे, -पत्नी
२) कु. यशराज रामकृष्ण भदाणे, - मुलगा
३) कु. माधवी रामकृष्ण भदाणे - मुलगी
४) सौ. विमलबाई यशवंत भदाणे - आई

मयताला वरीलप्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस विविध प्रकारच्या सरकारी (शासकीय), निमसरकारी (निमशासकीय) महसुली कामांसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसव्यतिरीक्त वारस हक्का असल्यास सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीदवारे कळविण्यात येते की वरील वारसा व्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधीकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क स्तर यांच्या न्यायालयात दि. २८/०२/२०२४ रोजी स्वत अगर वकीलामार्फत हजर राहावे वरीलप्रमाणे करण्यास चुकल्यात तर आपल्या या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारचे काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाच्या सही शिक्यानिशी प्रसीध्दीत दिली आहे.

स्थळ- साक्री
दि.२२/०१/२०२४ आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** **सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायलय क.स्तर साक्री** **दिवाणी न्यायलय क.स्तर साक्री**

---

**ॲड. एम. व्ही. घरटे, धुळे.**
**नि.६**

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मे. ५ हे सह दिवाणी न्यायाधिश साो., (क.स्त.) यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ११८/२०२४**

१. श्री. महेश माधव पांदे उ.व.-४२, धंदा-खा.नोकरी,
रा.मु.पो.होळ, महादेव मंदिर परिसर, ता.शिंदखेडा, जि.धुळे. ....**अर्जदार**
**॥ विरुध्द ॥**
१) कै. हिराबाई माधवराव पांदे,
मयताचा पत्ता-कदमबांडे नगर, नगांवबारी, देवपुर, धुळे.
मृत्यु दिनांक : २५/११/२०२२
२) श्री. माधव नारायण पांदे उ.व.-६७, धंदा-व्यापार,
रा. मातोश्री नगर, देवपुर, धुळे.
३) श्री. योगेश माधव पांदे, उ.व.-४४, धंदा-व्यापार,
रा. कदमबांडे नगर, नगांवबारी, देवपुर, धुळे.
४) कै.योगिता सुभाष खैरनार,
मयताचा पत्ता-मातोश्री नगर, देवपुर, धुळे.
मृत्यु दिनांक : ०७/११/२०१५
५) कु. कोमल सुभाष खैरनार, उ.व.-१३, धंदा-शिक्षण,
रा. मातोश्री नगर, धुळे. (सा.वाला क्रं. ५ तर्फे अ.पा.क. आजोबा म्हणुन सा.वाला क्र.३) .....**सा. वाला**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

१. अर्जदार यांनी ते व सा. वाला क्रं. २ व ३ तसेच सा.वाला क्रं. ५ हे मयत कै. हिराबाई माधवराव पांदे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाकामी कोणाचीही काही एक हरकत असल्यास त्यांनी दिनांक : २८/०२/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता आपण स्वतः अथवा आपल्या वकीलांमार्फेत हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी.

३. उक्त दिवशी व वेळी कोणी हजर न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन पुढील आदेश पारीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काही एक तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस न्यायालयाचे शिक्यानिशी व माझे सहीनिशी आज दि.२२/०१/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : २२/०१/२०२४ आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय (व.स्तर) धुळे** **दिवाणी न्यायालय (व.स्तर) धुळे**

## न्यूज कॉलम

### शहर, परिसरातून ७५ हजाराचा गुटखा जप्त

**नाशिक ।** शहर व परिसरात जिल्हा पोलिस अधिक्षक शहाजी उमाप यांचे विशेष पथक व स्थानिक पोलिसांनी पाच वेगवेगळ्या ठिकाणी छापा टाकून सुमारे ७५ हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त केला. यरोज कारवाई करूनही अवैधरीत्या गुटखा विक्री सुरुच आहे. विविध प्रकारचा गुटखा, जर्दा असा सुमारे ४६ हजार ६३० रुपयांचा ऐवज जप्त केला. तालुक्यातील चिखल ओहोळ शिवारात आई भवानी हॉटेल व पान स्टॉलवर दुसरी कारवाई करण्यात आली.

### दुचाकीच्या वेगवेगळ्या अपघातात तीन जणांचा मृत्यू

**नाशिक ।**शहरात तीन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात ३ जणांचा मृत्यू झाला. छत्रपती संभाजीनगर रोड, नाशिकरोड आणि जेलरोड येथे अपघात घडले. संबंधित पोलिस ठाण्यांत नोंद करण्यात आली आहे. जितेंद्रसिंग सैनी (रा. संत जनार्दनस्वामीनगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार,मुलगा गुरुजीतसिंग जितेंद्रसिंग सैनी(२२) दुचाकीने जात असताना कारने धडक दिल्याने गंभीर जखमी झाला. उपचार सुरू असताना मृत्यू झाला.

# धुळ्यात रंगला अहिराणी गीतांचा संगीतमय कार्यक्रम

### डॉ.विलास बच्छाव यांनी धरला ठेका

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**








धुळे शहरात जल्लोष भक्तीचा, जागर श्री रामजन्म भूमीचा हा सुप्रसिद्ध सुपरहीट प्रभू श्रीराम, सप्तश्रृंगी देवी व कानबाई माता यांचा सुमधुर भव्य अहिराणी गीतांचा संगीतमय कार्यक्रम श्री राम मंदिर प्रांगण, पंचवटी, देवपूर, धुळे येथे करण्यात आला होता. विविधांगाने नटलेल्या संगीतमय संध्याकाळचा आस्वाद घेत, धुळेकरांनी या संधीचा आनंद लुटला. संगीतप्रेमी श्रोत्यांच्या सक्रिय उपस्थितीने बहार आणली. तर तरी धुळेकर नागरिकांनी डॉ विलास बच्छाव यांचे कौतुक देखील केले.

सप्तश्रृंगी गडावर जाणाऱ्या शिरपुर मानाच्या रथाचे मानकरी व सुप्रसिध्द अहिराणी कानबाई आणि सप्तश्रृंगी देवीच्या सुपरहीट भक्तिगीतांचे निर्माते/ गितकार/गायक आबासाहेब चौधरी, धिरज चौधरी खान्देश किंग ग्रुप बजरंग बँड शिरपूर यांची देखील विशेष उपस्थिती होती. धुळे शहरातील श्री राम मंदिर प्रांगण, पंचवटी, देवपूर, धुळे येथे डॉ. विलास बच्छाव व श्री सिद्धेश्र्वर महादेव मंदिर सेवा समिती, पंचवटी यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमात नागरिकांनी गाण्यावर ठेका देखील धरला होता. तसेच धुळेकर नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली होती. अहिराणी बोलीभाषेतील पारंपारीक गीतांद्वारे खान्देशच्या संस्कृतीचे यावेळी दर्शन देखील झाले.तसेच यावेळी डॉ विलास बच्छाव यांनी धुळ्यातील एकविरा देवी मंदिरात देखील दर्शन घेतले. नागरिकांसोबत संवाद देखील साधला.

### लहान मुलांचा सहभाग उल्लेखनीय

**या कार्यक्रमात बालगोपाळांमध्येही प्रचंड उत्सुकता होती. कार्यक्रमांमध्ये रामाची वेशभूषा करून अनेक लहान मुले सहभागी झाली होती. डोक्यावर भगवी टोपी घातलेले, गळ्यात श्रीराम लिहिलेले उपरणे घालून उत्सवात सहभागी झालेले बालगोपाळ लक्ष वेधून घेत होते. काही जण शंख, डमरू वाजवत 'जय श्रीराम... सियावर रामचंद्र की जय...' अशा घोषणा देत आनंदोत्सव साजरा करत असल्याने कार्यक्रमात उत्साह निर्माण झाला. पारंपरिक वेषात सहभागी झालेल्या नागरिकांनी भगवे फेटे, श्री राम लिहिलेल्या टोप्या, स्कार्फ परिधान केले होते. हातात ध्वज घेऊन 'जय श्री राम' चा अखंड जयघोष केला जात होता. त्यात महिला, लहान मुलांचा सहभाग लक्षणीय होता.**

### रसिकांची प्रचंड गर्दी

**यावेळी धुळेकर नागरिकांनी अहिराणी गीताला उदंड प्रतिसाद देते ठेका देखील धरला होता.रसिकांना अहिराणी गीते ऐकायला मिळाल्यामुळे त्यांनीही या गीताला भरभरून प्रतिसाद दिला. दरम्यान कार्यक्रमाला रसिकांची प्रचंड गर्दी केली होती. अनेकजण व्यासपीठाच्या अगदी जवळपर्यंत जमिनीवर बसले होते तर अनेकांनी उभे राहून कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.**



## सॅटर्डे संडे सायकलिंग ग्रुप नाशिकतर्फे सायकलपटूंचा सन्मान सोहळा उत्साहात

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

सॅटर्डे संडे सायकलिंग ग्रुप नाशिक यांच्यातर्फे राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त दि. १० डिसेंबर २०२३ ते १० जानेवारी २०२४ या कालावधीत २१ दिवस सायकलिंग चॅलेंज आयोजित करण्यात आले होते. यात १८० सायकलपटूंनी सहभाग नोंदवून १४७०७४ किलोमीटर सायकलिंग पूर्ण केले. त्यानिमित्ताने सर्व सायकलपटूंचा मेडल व विविध बक्षीसं देऊन सन्मान सोहळा नुकताच कालिका माता मंदिर सभागृहात तृप्तीदा काटकर यांनी आयोजित केला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिक महापालिका जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद हे होते. सायकलपटूंना प्रेरणादायी मार्गदर्शन त्यांनी आपल्या भाषणातून केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनचे माजी अध्यक्ष किशोर माने, माजी उपाध्यक्ष चंद्रकांत नाईक, इंटरपॅक इंडिया नासिक कंपनीचे संचालक कौस्तुभ मेहता, तरंग चिटणीस, सुवर्ण तीर्थ अलंकारचे संचालक अजय लोखंडे, वर्षा भोसले हे मंचावर उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन बाबू ताजनपुरे यांनी केले. यावेळी सूर्यकांत आहेर यांचे मार्गदर्शन कार्यक्रमासाठी लाभले. तर डी. एम. बोरसे यांनी गायलेल्या सदाबहार गीतांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## लायन्स क्लब मंदिर सुशोभीकरण स्पर्धेत आग्रारोड वरील राममंदिरास प्रथम पारितोषिक

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



अयोध्येमध्ये नवीन भव्य राम मंदिरात प्रभू रामाच्या मूर्ती ची प्राण प्रतिष्ठा कार्यक्रमाचे औचित्य साधून लायन्स क्लब धुळे आणि श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था तर्फे प्रथमच भव्य मंदिर आरास सुशोभीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने धुळे नगरातील बहुसंख्य मंदिरांचे सुशोभिकरण करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये खालील प्रमाणे पारितोषिके जाहीर करुन वितरीत करण्यात आले. यात प्रथम- राम मंदिर, आग्रा रोड,द्वितीय - राम मंदिर, सुभाष नगर, तृतीय - महादेव मंदिर, पंचवटी उत्तेजनार्थ - दक्षिण मुखी मारुती मंदिर उत्तेजनार्थ - महादेव मंदिर, नकाणे रोड या स्पर्धेसाठी श्रीराम नागरी पत संस्थेकडून श्री विशालजी केले , श्री धीरजजी देसरडा तसेच लायन्स क्लब धुळे मधून श्री नितिनजी बंग, विनय जाधव, अजय कासोदेकर, केयुर शाह तसेज श्री जितेंद्र पिंगळकर सर व रामराजे सर ह्यांचे सहकार्य लाभले.

## गीत रामायण कार्यक्रमाला धुळेकर नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद






**धुळे । श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे प्रस्तुत प्रसिद्ध कथाकार व गायक पं. डॉ. अभय मानके श्रीमती अमृता मानके इंदौर (म.प्र.) यांच्या कल्याणकारी गीत रामायण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला धुळेकर नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती देखील लावली होती.**



## श्रीराम प्राणप्रतिष्ठापना निमित्त जैताणे शहरात विविध मंदिरात धार्मिक कार्यक्रम

**जैताणे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

२२ जानेवारी रोजी अयोध्या येथे श्रीराम मंदिर व श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठापना करण्यात आले. त्यानिमित्त जैताणे शहरातील जय भद्रा व्यायाम शाळा सह विविध मंदिरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व देशवासीयांचे लक्ष वेधलेले अयोध्या येथील श्रीराम मंदिर व श्रीराममूर्ती प्राणप्रतिष्ठापना निमित्त २२ जानेवारी रोजी देशभरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या प्रमाणात करण्यात आले होते. त्याच अनुषंगाने जैताणे शहरांमध्ये व जय भद्रा ग्रुप व्यायाम शाळाचे वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

श्रीरामच्या मूर्ती ची महापूजा व अभिषेक आरती करून महाप्रसादाचा भोग चढवण्यात आला. विविध कार्यक्रमानचे आयोजन करण्यात आले व सर्व राम भक्तांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला. यावेळी जय भद्रा ग्रुपचे अध्यक्ष रवींद्र न्याहळदे, निजामपूर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस एपीआय हनुमंत गायकवाड, व पोलीस उपनिरीक्षक विशाल पाटील,स्टार सिक्युरिटीचे मालक संदीप बोरकर, जगदीश भदाणे, दीपक बागुल, गुलाब बाविस्कर, संजय सूर्यवंशी, केवबा मोरे, दिलीप पगारे, त्रिंबक पगारे, राजेंद्र जाधव, मच्छिंद्र पगारे, ॲड. दीपक बोरसे आदी जय भद्रा ग्रुप व्यायाम शाळेचे मल्ल व संपूर्ण संजय नगर चे राम भक्त उपस्थित होते.

## आज 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' दौडचे आयोजन

**नाशिक ।** 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा केंद्र शासन पुरस्कृत कार्यक्रम असून त्याच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा स्तरावर टास्क फोर्सची स्थापना करण्यात आलेली आहे. मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढविणे, मुलींच्या जन्माचे स्वागत करणे, लिंगसमभाग वाढविणे, लिंग निवडीस प्रतिबंध करणे, बालविवाहास प्रतिबंध करणे, मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, मुलींमधील सुप्त गुणांना चालना देणे, महिलांचे सक्षमीकरण असे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. सन २०२३-२०२४ च्या कृती आराखड्यानुसार दि.२४ रोजी बालिका दिनानिमित्त सकाळी ७.३० वाजता 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' मॅरेथॉन रॅलीचे आयोजन केलेले आहे. ही रॅली जिल्हा परिषद नाशिक येथून सुरु होणार आहे.

## 'अतुलनीय भारत' थीमवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्याविष्कार

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**




शहरातील आर.सी.पटेल प्राथमिक शाळेत 'अतुलनीय भारत' थीमवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे सीईओ डॉ.उमेश शर्मा, पी.एसआय. छाया पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. नीता सोनवणे, बी.एस.बुवा, अकॅडमीक ईंचार्ज पी.व्ही.पाटील, आदर्श शिक्षक प्रवीण माळी, शिरपूर मर्चंट बँक संचालक संदीप देवरे, ॲड. नरेश शर्मा, सेवानिवृत्त मुख्याध्यापक यशवंतराव पाटील, मुख्याध्यापक बी.आर.महाजन, महेंद्रसिंग परदेशी, ईश्र्वर पाटील, गणेश साळुंके, गोपाल पाटील, आर.बी.खोंडे, मधुबाला राही, दामिनी पथक सदस्या, विद्यालयाचे मुख्याध्यापक सी.डी. पाटील आदी उपस्थित होते.

'अतुलनीय भारत' थीम वर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंत अर्थात उत्तरेपासून तर दक्षिणेपर्यंतची विविध राज्याची वैशिष्ट्य, वेशभूषा, खानपान, राहणीमान, भाषा आदी बाबी नृत्य, नाट्य, एकांकिका, समूहगीताच्या माध्यमातून दाखवून उपस्थित पालक प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमात बालवाडी ते चौथी वर्गातील ६०० विद्यार्थ्यांनी कला सादर केली. प्रास्ताविका मुख्याध्यापक सी.डी. पाटील यांनी वर्षभरातील शालेय कामगिरी पी.पी.टी. च्या माध्यमातून पालकांना दाखवली. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तिसरी व चौथीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी केले. औपचारिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेकानंद ठाकरे यांनी तर आभार महेंद्र माळी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता 'मिले सूर मेरा' या गीताने करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संयोजन केले.

## पिंपळनेर येथील शोभायात्रेत उसळला जनसागर

**पिंपळनेर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



प्रभू श्रीरामचंद्राच्या अयोध्या प्रतिष्ठापनेच्या प्रश्र्वभूमीवर पिंपळनेर परिसरातील नागरिकांचा उत्साह शिगेला पोहचला होता. पूर्वसंध्येलाच विदुयात रोषणाई ने गाव उजळुन निघाले होते. श्रीराम मंदिरात पिंपळनेर रहिवासी व कर्म आ मा पाटील विद्यालय,राजे छत्रपती मार्शल आर्टस् स्कूल,डी जे अग्रवाल,सेयन इंटरनॅशनल स्कूल,फार्मसी कॉलेज ,एन एस पी विद्यालय,शांताई माध्यमिक विद्यालय,इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक , येथील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी विविध पोशाख परिधान करून शोभा यात्रेची शोभा वाढवली. शोभायात्रा श्रीराम मंदिरा पासून सुरू होऊन संजय नगर ,इंदिरा नगर ,बस स्टॅन्ड ते सटाणा रोड ने निघाली शोभयसत्रेचे एक टोक सामोडे चौफुली ते दुसरे टोक जे टी पॉईंट अशी ना भूतो ना भविष्यती शोभायात्रा होती.

## राष्ट्रध्वजाचा नागरिकांनी मान राखावा: पोलिस अधीक्षक धिवरे

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही याची सर्व नागरिकांनी काळजी घ्यावी. राष्ट्रध्वजाचा नागरिकांनी मान राखावा, असे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

पोलिस अधीक्षक श्री. धिवरे यांनी म्हटले आहे, दरवर्षी २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन हा देशभर साजरा करण्यात येतो. समारंभाचे विविध शासकीय, निमशासकीय तसेच खासगी संस्थांमार्फत ध्वजारोहण करण्यात येते. स्थानिक पातळीवर जनतेमार्फत राष्ट्रीय ध्वजाविषयी असलेले प्रेम, निष्ठा, अभिमान दर्शविण्याकरीता वैयक्तिकरीत्या छोट्या राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा. यासंदर्भात शासनामार्फत वेळोवेळी सूचना दिल्या आहेत. तसेच जाणीवपूर्वक जर राष्ट्रध्वजाचा अवमान करण्याचा प्रयत्न केल्यास राष्ट्रीय अवमान प्रतिबंध कायदा- १९७१ चे कलम २ अनुसार कारवाई करण्यात येते. काही वेळा राष्ट्रीय कार्यक्रमांच्या वेळी तसेच विविध कला, क्रीडा प्रसंगी वैयक्तिक रीत्या वापरण्यात येणारे राष्ट्रध्वज नंतर इतरत्र टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. जेणेकरुन नंतर हे छोटे- छोटे राष्ट्रध्वज रस्त्याचे कडेला किंवा इतरत्र ठिकाणी पडलेले, विखुरलेले आढळतात. हे दृश्य राष्ट्रीय प्रतिष्ठेला शोभणारे नसल्याने राष्ट्रध्वजाचे वापरानंतर एकतर त्याचा योग्य तो मान राहील याप्रमाणे ते ठेवण्यात यावे. अथवा शासकीय संस्था, तसेच इतर संघटनांना सुपूर्द करावे. सदर अशासकीय संस्था व संघटनांनी त्यांना शासनाने दिलेल्या अधिकारानुसार सदरचे राष्ट्रध्वज मा. जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडे सुपूर्द करावेत. रस्त्यात पडलेले इतरत्र विखुरलेले राष्ट्रध्वज दिसणे राष्ट्र प्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत गंभीर असल्याने केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरीता प्लॉस्टिकच्या वापरास मान्यता नाही. प्लास्टिकचे ध्वजाचा वापर पूर्णपणे बंद करावा. कागदी ध्वजाचा वापर करताना त्याचा योग्य तो मान राखणे आवश्यक आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही यांची सर्व नागरिकांनी काळजी घ्यावी असेही पोलिस अधीक्षक श्री. धिवरे यांनी नमूद केले आहे.

## शेतकरी सहकारी संघ लि.साक्रीच्या शेतकरी सभासदांना अखेर मिळाला न्याय

**साक्री । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



तालुक्यातील शेतकरी सहकारी संघ लिमिटेड साक्री या शेतकऱ्यांच्या सुरू असलेल्या एकमेव सहकारी संस्थेचे सुमारे १३,००० सभासद असताना देखील २०२३ च्या मागील निवडणुकीत फक्त ५३०० सभासदांना मतदानाचा हक्क बजावता आला यावरून तालुक्यातील अनेक शेतकरी सभासदांनी नाराजी व्यक्त केली होती.

शेतकरी सहकारी संघाच्या मागील सत्ताधारी गटाने शेतकरी सभासदांचे संचालक कमी करुन मोजक्याच असलेल्या वि.का.सोसायटी संस्था प्रतिनिधींचे संचालक संख्या बेकादेशिर रित्या वाढविल्याबद्दल, म्हणजेच शेतकरी संघ सुमारे १०० वि.का. सोसायट्यांच्या माध्यमातुन मोजक्या लोकांच्या ताब्यात ठेवण्याच्या प्रयत्ना विरुध्द गेल्या ७ वर्षापासून ड.नरेंद्र मराठे यांनी लढा सुरू ठेवला होता. त्या बेकायदेशिर दुरुस्तीस न्यायलयाने रद्द ठरविले व निवडणूक प्रक्रिया पार पडली,त्यानंतर शेतकरी विकास पॅनलच्या संचालकांनी लावून धरलेली सभासदांची शेअर्स फी भरुन घेण्याची मागणी मान्य झाल्या नंतर त्या लढ्यास आज अखेर न्याय मिळाला आहे.

शेतकरी सहकारी संघ लिमिटेड साक्री ही सहकारी संस्थेचे कार्यालय साक्री शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून संपूर्ण तालुक्यात शेतकरी सहकारी संघाचे कार्यक्षेत्र आहे. तसेच शेतकरी सहकारी संघाचे मालकीचे जवळपास ५५ व्यापारी गाळे शहरात मध्यवर्ती ठिकाणी आहेत त्या माध्यमातून साक्री शहरात एक मोठे व्यापारी संकुल तयार झालेले आहे. तसेच पिंपळनेर येथे टेंभे रोड आणि चिकसे रोड या ठिकाणी देखील शेतकरी सहकारी संघाच्या जागा आहेत. गेल्या काही वर्षापासून कुठल्याही पद्धतीचे सकारात्मक काम दिसून आले नाही तसेच सहकारी संस्थेचा मूळ आत्मा म्हणजे सभासद असतो. परंतु तत्कालीन सत्ताधार्यांनी सभासदांचे सभासदत्वच नाकारले आणि या गोष्टीला तत्कालीन संचालक आणि धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्री. जितेंद्र मराठे यांनी हरकत घेतली,परंतु सत्ताधारी गटाचे नेते काहीही ऐकून घेण्यास तयार नव्हते म्हणून नरेंद्र मराठे यांनी तब्बल सात वर्ष न्यायालयीन लढाई देत शेतकरी सभासदांना संख्येनुसार संचालक मंडळात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी प्रयत्न केले व माननीय उच्च न्यायालयाने त्यांची बाजू ऐकून घेत निवडणूक घेण्याचे आदेश दिले. यावेळी धुळे जिल्हा भाजपाचे उपाध्यक्ष चंद्रजीत भैय्या पाटील धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र मराठे साक्री तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष दीपक साळुंखे शिवसेनेचे शहर प्रमुख राहुल भोसले भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष एस.बी.अहिरराव, सचिन सोनवणे, सुरेश शेवाळे, राकेश आहिरराव, स्वप्निल भावसार तसेच तालुक्यातील वेगवेगळ्या पक्ष आणि संघटनांचे पदाधिकारी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# धुळ्यात रंगला अहिराणी गीतांचा संगीतमय कार्यक्रम

## धुळेकर नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : डॉ विलास बच्छाव यांनी धरला ठेका


























धुळे । धुळे
शहरात जल्लोष भक्तीचा, जागर श्री रामजन्म भूमीचा हा सुप्रसिद्ध सुपरहीट प्रभू श्रीराम, सप्तश्रृंगी देवी व कानबाई माता यांचा सुमधुर भव्य अहिराणी गीतांचा संगीतमय कार्यक्रम श्री राम मंदिर प्रांगण, पंचवटी, देवपूर, धुळे येथे करण्यात आला होता. विविधांगाने नटलेल्या संगीतमय संध्याकाळचा आस्वाद घेत, धुळेकरांनी या संधीचा आनंद लुटला. संगीतप्रेमी श्रोत्यांच्या सक्रिय उपस्थितीने बहार आणली. तर तरी धुळेकर नागरिकांनी डॉ विलास बच्छाव यांचे कौतुक देखील केले. सप्तश्रृंगी गडावर जाणाऱ्या शिरपुर मानाच्या रथाचे मानकरी व सुप्रसिध्द अहिराणी कानबाई आणि सप्तश्रृंगी देवीच्या सुपरहीट भक्तिगीतांचे निर्माते/गितकार/गायक आबासाहेब चौधरी, धिरज चौधरी खान्देश किंग ग्रुप बजरंग बँड शिरपूर यांची देखील विशेष उपस्थिती होती. धुळे शहरातील श्री राम मंदिर प्रांगण, पंचवटी, देवपूर, धुळे येथे डॉ. विलास बच्छाव व श्री सिद्धेश्र्वर महादेव मंदिर सेवा समिती, पंचवटी यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात नागरिकांनी गाण्यावर ठेका देखील धरला होता. तसेच धुळेकर नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली होती. अहिराणी बोलीभाषेतील पारंपारीक गीतांद्वारे खान्देशच्या संस्कृतीचे यावेळी दर्शन देखील झाले.तसेच यावेळी डॉ विलास बच्छाव यांनी धुळ्यातील एकविरा देवी मंदिरात देखील दर्शन घेतले. नागरिकांसोबत संवाद देखील साधला.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक






# अजंदे बुद्रुकला श्रीराम प्राणप्रतिष्ठा उत्सव जल्लोषात साजरा

## महाप्रसाद, विविध स्मारकांना अभिवादन करत भव्य रॅलीचे आयोजन

























धुळे । प्रभू श्रीराम यांचे आयोध्या येथील भव्य मंदिर उद्घाटन व रामलल्ला प्राणप्रतिष्ठेनिमित्त अजंदे बुद्रुक येथील शिवजयंती उत्सव समितीतर्फे विविध कार्यक्रमांचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते.अजंदे बुद्रुक येथील जवळपास शंभर वर्षांपूर्वीचे श्रीराम मंदिरात भजन कीर्तनाचा कार्यक्रमांसह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच श्रीराम मंदिर व मारुती मंदिरात श्री रामरक्षा स्तोत्र, हनुमान चालीसा, भजन, व महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. तर रात्री लेझीम, नृत्य, भजन, पोवाडे गात संपूर्ण गावातून निघालेल्या मिरवणुकीच्या माध्यमातून प्रभू श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांचा सजीव देखावा सादर करण्यात आला. सदर मिरवणुकीदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज, रामायण निर्माते वाल्मीक ऋषी, विर एकलव्य, संत सेवालाल महाराज तथा रामदेवजी बाबा स्मारक, संत भीमा भोई व महाराणा प्रतापसिंह यांच्या स्मारकांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांकडून ठिकठिकाणी रॅलीवर पुष्पवृष्टी करून रॅलीचे स्वागत केले. तर शिवपुत्र मित्र मंडळाने मोतीचूर्ण लाडूंचे प्रसाद म्हणून वाटप केले. कार्यक्रमास अजंदे बुद्रुकचे माजी सरपंच तथा विद्यमान उपसरपंच चंद्रकांत पाटील, सरपंच संजय भील, ग्रामपंचायत सदस्य तुळशीराम मराठे, भावडू मराठे, ज्ञानेश्र्वर सोमवंशी, ओमेंद्रसिंग राजपूत, डॉ. उमेश पाटील, तन्वीर शिंपी, कैलास मराठे आदींसह ग्रामस्थ, महिला, बालकांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवजयंती उत्सव समितीसह गावातील तरुणांचे सहकार्य लाभले.

संकलन : योगेश पाटील